सत्यमेव जयते

# क्षेत्र अधिकाऱ्यासाठी तपासणी सूची २०२३

## २०२३-२४

## भारत निवडणूक आयोग

## भारत निर्वाचन आयोग

**Election Commission of India**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.

# क्षेत्र अधिकाऱ्यासाठी तपासणी सूची २०२३

## भारत निवडणूक आयोग

**२०२३-२४**


**भारत निर्वाचन आयोग**

**Election Commission of India**

**निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.**

**दस्तऐवज क्रमांक ३२४.६. इपीएस ८:२०२३**

वाय १९१७—१

## क्षेत्र अधिकाऱ्यासाठी तपासणी सूची

**१. कार्ये आणि जबाबदाऱ्या :**

(एक) क्षेत्र अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणुकीच्या व्यवस्थापनासाठी जबाबदार असणे.

(दोन) मतदानाच्या दिवसाच्या किमान सात दिवस आधी, त्याच क्षेत्रासाठी क्षेत्र दंडाधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येईल आणि विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार देता येतील.

(तीन) १ ते २ तासात १०-१२ मतदान केंद्रांना भेट देण्यासाठी व्यवस्थापन योग्य क्षेत्र नियुक्त केले आहे.

(चार) नियुक्तीनंतर, क्षेत्र अधिकाऱ्याने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून पुढील कागदपत्रे गोळा करावी :—

**एक.** त्या भागातील प्रत्येक विभागाच्या मतदारांशी संपर्क साधणे शक्य व्हावे यासाठी वाडीचे/पाड्याचे नाव इत्यादीसह प्रत्येक मतदान केंद्र (पीएस) ची मतदार यादी ;

**दोन.** मतदान केंद्रनिहाय आश्वासित किमान सुविधा (अलिकडे अद्ययावत केलेल्या) ;

**तीन.** मतदारांची उपस्थिती (मागील २ सार्वजनिक निवडणुकांमधील) ;

**चार.** स्त्रीपुरुष निहाय मतदार ;

**पाच.** आदर्श आचार संहितेच्या (एमसीसी) उल्लंघनाची प्रकरणे (मागील २ सार्वत्रिक निवडणुकीतील) ;

**सहा.** त्यांच्या क्षेत्रात येणाऱ्या मतदान केंद्रांची विस्तृत मांडणी आणि स्थान दर्शवणारा त्यांच्या क्षेत्राचा मार्ग नकाशा ;

**सात.** जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने तयार केलेला व्हीएम-१ अहवाल.

(पाच) जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी आणि निरीक्षक यांच्यासोबत आढावा बैठकीस वारंवार उपस्थित राहणे.

(सहा) संदेशवहन योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मतदान पथकांच्या व मतदान केंद्राच्या भ्रमणध्वनी क्रमांकांचा तपशील गोळा करणे.

(सात) ज्या मतदारांना मतदानाच्या हक्काचा वापर निर्भयपणे करताना कोणताही धोका, अनुचित प्रभाव, धाकदपटशा किंवा हस्तक्षेप होणे अशा बाबतीत असुरक्षित आहेत अशा अल्पसंख्यांक किंवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासारख्या समाजातील दुर्बल घटकांची मतदार क्षेत्र असलेली गावे/वस्त्या/विभाग ओळखण्यासाठी असुरक्षितेचे मूल्यमापन करणे.

(आठ) प्रत्येक मतदान केंद्रावर पुढील आश्वासित सुविधा आहेत याची खात्री करणे :—

- ✓ चढणी-उतरणी रस्त्यांची (रॅम्पची) तरतूद
- ✓ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- ✓ पुरेसे फर्निचर
- ✓ योग्य प्रकाश व्यवस्था/विद्युत व्यवस्था
- ✓ मदत कक्ष
- ✓ माहिती फलक
- ✓ स्त्री-पुरुषांसाठी पाण्याची व्यवस्था असलेली प्रसाधनगृहे
- ✓ छप्पर असलेली जागा

(नऊ) मतदानापूर्वी आणि मतदानादरम्यान, मतदान केंद्रावर योग्य निवडणूक व्यवस्थापन असल्याची सुनिश्चिती करणे.

**२. मतदानपूर्व जबाबदारी—मतदानाच्या ठिकाणाविषयी**

(एक) नकाशावर रेखाटलेला मार्ग व्यवहार्य आहे किंवा कसे याची पडताळणी करणे—प्रवेशमार्ग सुगमतेची खात्री करणे ;

(दोन) मतदान केंद्रावरील पायाभूत सुविधांची खात्री करणे—पाणी, छप्पर, चढण-उतरण असलेले रस्ते (रॅम्पस्), फर्निचर, प्रसाधन गृहे, दूरध्वनी इत्यादी आणि इमारतीची वास्तविक स्थिती ;

(शा.म.मु.) वाय १९१७-२ (७३५०—११-२०२३)

(तीन) नवीन मतदान केंद्र निर्माण केले असेल तर, नवीन मतदान केंद्राविषयी मतदान क्षेत्रास व्यापक प्रसिद्धी देण्यात येत आहे याची सुनिश्चिती करणे ;

(चार) मतदान केंद्राच्या ठिकाणी भ्रमणध्वनी व इंटरनेट जोडणी असल्याची खात्री करणे.

(पाच) मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात कोणताही राजकीय पक्ष/प्रतिस्पर्धी उमेदवार यांची कार्यालये स्थित नसल्याची सुनिश्चिती करणे.

(सहा) अनधिकृत प्रचाराच्या वाहनांची जा-ये, मालमत्तेचे विद्रुपीकरण, अनधिकृत प्रचार, सार्वजनिक इमारती/शासकीय वाहने/शासकीय कर्मचारी यांचा गैरवापर आणि आदर्श निवडणूक आचार संहितेची सर्व संभाव्य उल्लंघन, यावर लक्ष देणे आणि अहवाल देणे.

**३. मतदानापूर्वीची जबाबदारी-मतदारांबद्दल**

(एक) मतदान छायाचित्र ओळखपत्र व्याप्तीक्षेत्र कार्यक्रमाविषयी विनिर्दिष्ट माहिती देणे ;

(दोन) सर्व नेमून दिलेल्या मतदान केंद्राचा समावेश असलेल्या, जलग्रहण क्षेत्रातील मतदारांसाठी चालवल्या जाणाऱ्या फिरत्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे ;

(तीन) मतदारांसाठी हेल्प लाईन आणि त्यांच्या मतदान केंद्राच्या ठिकाणाविषयीची माहिती देणे ;

(चार) मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यामार्फत किंवा ऑनलाईन पद्धतीने मतदारांना छायाचित्र मतदारयादीतील त्यांची नावे व नोंदी तपासण्यासाठी जागरूक करणे.

**४. मतदानपूर्व जबाबदारी-असुरक्षिततेच्या मापनाबद्दल**

(एक) असुरक्षिततेच्या मापनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार धमकी आणि धाकदडपशा यांसारख्या घटना घडणारी गावे, वाड्या, विभाग आणि मतदारांचे विभाग निश्चित करणे ;

(दोन) ज्या व्यक्तींमुळे असुरक्षितता निर्माण होते अशा व्यक्तींची ओळख पटविणे अशा व्यक्तींच्या संख्येविषयी नाही, तर त्यांच्या नावांविषयीची माहिती उघड न करता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला/जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला अशा प्रत्येक ठिकाणासाठी/क्षेत्रखंडासाठी विहित नमुन्यात स्वताःकडे एक प्रत ठेवून स्वतंत्र लिफाफ्यात द्यावयाची माहिती ;

(तीन) गुप्तवार्ता माहिती संकलीत करून आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपाययोजना करण्यासाठी आणि असुरक्षिततेच्या मापनाशी चांगल्या प्रकारे जुळवून घेण्यासाठी वारंवार भेटी देणे आणि जनतेबरोबर विस्तृत चर्चा करणे ;

(चार) असुरक्षित समुदायांची त्यांच्या दूरध्वनी क्रमांकासह संपर्क ठिकाणे ;

(पाच) मतदानासाठी मतदारांचा मुक्त प्रवेश सुनिश्चित करण्याचे उत्तरदायित्व ;

(सहा) क्षेत्र अधिकारी त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्राला भेट देताना, सोबत क्षेत्र पोलीस अधिकारी असेल ;

(सात) क्षेत्र दंडाधिकारी म्हणून काम करतान तो, मतदान केंद्राचा रेखाचित्रण नकाशा, मतदान केंद्राच्या आणि निवडणुकीशी संबंधित, अधिकारी, पोलीस ठाणे यांच्या दूरध्वनी क्रमांकाची यादी, जबाबदार व्यक्तींची यादी समाजविरोधी घटक इत्यादींच्या यादी क्षेत्र दंडाधिकाऱ्याची योजना तयार करील.

**५. मतदान-पूर्वसंध्येची जबाबदारी**

(एक) मतदान पथके आणि सर्व साहित्य त्यांच्यासंबंधित मतदान केंद्रावर पोहचले असल्याची सुनिश्चिती करणे ;

(दोन) तैनात योजनेनुसार मतदान केंद्रावर सुरक्षा दल पोहचले असल्याची सुनिश्चिती करणे ;

(तीन) मतदान कर्मचाऱ्यांमध्ये (इव्हीएम) इलेक्टॉनिक मतदान यंत्र व्ही व्ही पॅट हाताळण्यावरी किंवा मतदान प्रक्रियेवरील शेवटच्या क्षणी येणाऱ्या कोणत्याही शंकेबाबत स्पष्टीकरण देणे ;

(चार) मतदान पथक आणि मतदान केंद्राच्या तयारीबद्दल पूर्ण समाधान झाल्यानंतर, नियंत्रण कक्षाला सर्व गोष्टी ठीक असल्याबाबातचा (ओके) अहवाल देणे ;

(पाच) वाटप केलेल्या जावक कक्षामधून राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट संकलित करणे ;

(सहा) क्षेत्र अधिकाऱ्याने ठेवलेल्या राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट यांवर " राखीव " असे लिहलेली योग्य खूण चिठ्ठी लावण्यात आली पाहिजे ;

(सात) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची ने-आण करण्यासाठी आणि सशस्त्र सुरक्षेसाठी भौगोलिक स्थाननिश्चयन प्रणालीचा ट्रॅकींग घेण्यासाठी यंत्रणा असलेल्या वाहनांचा वापर करणे ;

(आठ) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या योजनेनुसार राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची असलेली साठवण व ने-आण.

**६. मतदानाच्या दिवशीची जबाबदारी**

(एक) नेमून दिलेल्या सर्व मतदान केंद्रांना शक्य असलेल्या कमीत कमी नियतकालिक अंतराने वारंवार भेट देणे ;

(दोन) मतदान सुरू होण्यापूर्वी अभिरूप मतदानाच्या स्थिती विषयक खात्री करणे. कोणतीही समस्या असल्यास, निराकरण करण्यासाठी उपायात्मक कृती करणे ;

(तीन) कोणताही विलंब न करता निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला पुढील अहवाल पाठवणे :—

(क) अभिरूप मतदान पूर्ण केल्याचे, अभिरूप मतदान प्रमाणपत्र जारी करणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामधून अभिरूप मतदानाची माहिती हटविणे. (व्हीव्हीपॅट मधून अभिरूप मतदान चिठ्ठ्या काढून टाकणे) ;

(ख) मतदान प्रारंभ करणे ;

(ग) अभिरूप मतदान व मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/ व्ही व्ही पॅट बदलणे.

(घ) अधिकृत मार्गाने दिलेल्या अंतराने झालेल्या अंदाजे मतदार उपस्थितीची माहिती देणे.

(ङ) मतदान समाप्ती—क्लोज बटण दाबणे, मोहरबंद प्रकिया करणे, मतदान साहित्य स्वीकृती केंद्र इत्यादी पर्यंत पोहचण्यासाठी निर्देशित केलेल्या मार्गावरील निर्देशित केलेल्या वाहनांमध्ये मतदान पथकाने प्रस्थान करणे.

(च) कोणत्याही अनुचित घटनेची माहती देणे आणि त्वरीत प्रतिसाद देणे/ सुधारात्मक उपाययोजना करणे.

(छ) इतर कोणत्याही अनुचित घटनेची माहिती देणे आणि त्वरीत प्रतिसाद देणे/ सुधारात्मक उपाययोजना करणे.

(चार) मतदान सुरू होण्यापूर्वी बदललेले कार्यरत नसलेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/ व्हीव्हीपॅट युनिट (अभिरूप मतदानशी संबंधित) मतदान केंद्राध्यक्षाकडे मतदान केंद्रात ठेवण्यात येऊ नये. अभिरूप मतदानदरम्यान बदललेले कार्यरत नसलेले युनिट, क्षेत्र अधिकाऱ्याकडे " अभिरूप मतदान बदलणे " असे लिहलेले योग्य स्टिकर वहन पेटीवर लावण्यात यावे.

(पाच) जेव्हा जेव्हा मतदान केंद्रामध्ये युनिटे, नियंत्रण युनिट बॅटरी (पावर पॅक) आणि व्ही व्ही पॅट बदलण्यात येतील तेव्हा तेव्हा विहित नमुन्यात स्वाक्षरी करणे.

(सहा) जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचनेनुसार प्रवर्ग क (मतदान न केलेले कार्यरत नसलेले-मतदानाच्या दिवशी अभिरूप मतदानादरम्यान बदललेले आणि ड (न वापरलेले राखीव) क्षेत्र अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट मतदान पूर्ण झाल्यानंतर जमा करण्यात येतील.

(सात) ज्या ठिकाणी अभिरूप मतदान प्रतिनिधीच्या अनुपस्थितीत घेण्यात आले असेल तेथे किंवा जेथे केवळ एकच मतदान प्रतिनिधी हजर होता अशा मतदान केद्राला वारंवार भेट देणे आणि त्याकडे लक्ष देणे.

(आठ) आवश्यक असेल तेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे बदलणे (क्षेत्र अधिकाऱ्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवणे);

(नऊ) मतदान प्रतिनिधींची उपस्थिती/ अनुपस्थितीबाबत मागोवा घेणे व त्याबाबत अहवाल देणे.

(दहा) आवश्यक असल्यास, मतदान केंद्राच्या आत, निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदान पथकास साहाय्य करणे.

(अकरा) मतदान प्रक्रियेची शुचिता राखणे आणि मतदान केंद्राच्या भेटीदरम्यान मतदानाचे सर्व पैलूंची तपासणी करणे.

(बारा) मतदानाची पद्धत तपासणे- मतदारांचा कोणताही विभाग त्याच्या अनुपस्थितीमुळे स्पष्ट निदर्शनात येत असेल तर, सुधारात्मक उपाययोजनेसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळविणे.

(तेरा) समर्पित पथकाला पाठवता यावे यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळविले नसेल तर, अतिसंवेदनशील वस्ती/ समुदायातील मतदार मतदानासाठी आले आहेत किंवा नाही याची पडताळणी करणे.

(चौदा) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मोहरबंद करणे आणि मतदान पथकांनी कागदपत्रे तयार करणे.

(पंधरा) प्राप्ती केंद्रापर्यंत मतदान पथकासोबत असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांना संरक्षण देणे.

(सोळा) कोणत्याही आकस्मिक प्रसंगी, आवश्यकता भासल्यास, राखीव पथकामधील मतदान कर्मचाऱ्याची नियुक्ती करणे.

(सतरा) मतदानाच्या शेवटी पुढील बाबींची सुनिश्चिती करणे :—

(क) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे क्लोज/बंद बटण दाबले आहे.

(ख) व्हीव्हीपॅटचा पावर पॅक काढून टाकण्यात आला आहे.

(ग) मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी योग्य रीतीने भरली आहे.

(घ) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट्स योग्यरीतीने मोहरबंद केले आहेत.

(ङ) नमुना १७ सी च्या प्रती मतदान प्रतिनिधींना दिल्या आहेत.

(च) १७ ए ची नोंदवही योग्यरीतीने भरली आहे.

(अठरा) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून नेमून दिलेल्या प्राप्ती केंद्रावर न वापरलेले राखीव आणि अभिरूप मतदान-कार्यरत नसलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट्स जमा करणे तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट्स बदलल्या बाबतचा अहवाल सादर करणे आणि (मतदार केंद्राध्यक्षाचा भाग चार आणि भाग पाच अहवाल आणि प्रमाणपत्र) सादर करणे.

**७. क्षेत्र अधिकाऱ्यांकडे पुढील माहिती व सुविधा उपलब्ध असाव्यात :—**

(एक) क्षेत्र अधिकारी, त्यांना विशेषतः इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, निवडणूक व्यवस्थापन, मतदान प्रक्रिया, आदर्श आचार संहिता आणि निवडणुकींचे इतर महत्त्वाचे पैलू यांच्या संबंधात पुरेसे प्रशिक्षण देण्यात आले आहे याची सुनिश्चिती करतील.

(दोन) क्षेत्र अधिकाऱ्याकडे जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून देण्यात आलेले **ओळखपत्र** असले पाहिजे आणि ते त्यांच्या क्षेत्राच्या भेटीदरम्यान त्यांचे ओळखपत्र नेहमी दिसेल असे लावल्याची सुनिश्चिती करावी.

(तीन) क्षेत्र अधिकाऱ्याकडे प्रत्येक मतदान केंद्रातील मतदारांच्या संख्येसह त्याच्या अधिकारितेत असलेल्या सर्व मतदान केंद्राची यादी असली पाहिजे.

(चार) क्षेत्र अधिकाऱ्याकडे त्याच्यासह संपर्कासाठी असलेली योजना, तयार असली पाहिजे.

**८. क्षेत्र अधिकाऱ्याला दिले जाणारे साहित्य :—**

(एक) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान केंद्र स्तरीय अधिकारी, यांना देण्यात येणारी प्रशिक्षणविषयक माहिती.

(दोन) अतिसंवेदनशील क्षेत्रासह त्याच्या क्षेत्राचा तपशीलवार नकाशा.

(तीन) साहित्याची ने–आण करण्याची योजना आणि मार्गाचा तक्ता.

(चार) त्याच्या क्षेत्रातील अधिसूचित मतदान केंद्रांची यादी.

(पाच) त्याच्या क्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या मतदान हेल्प लाईन विषयीचा तपशील.

(सहा) राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे.

(सात) क्षेत्र अधिकाऱ्याने (एसओने) निवडणूक निर्णय अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या, व्ही एम (नमुना २ व ३) ची प्रत.

**९. क्षेत्र अधिकाऱ्याने सादर करावयाचा अहवाल :—**

(एक) क्षेत्र भेटीच्या प्रत्येक फेरीसाठी, क्षेत्र अधिकारी, त्याच्या नियुक्तीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांना विहित नमुना **जोडपत्र—एक** मधील भेट नोंद अहवाल सादर करील.

(दोन) नमुना व्ही एम–२ आणि व्ही एम–३ मध्ये असुरक्षिततेचे मापन करणारा अहवाल.

(तीन) वरील परिच्छेद ६ (तीन) नुसार मतदानाच्या दिवसाचे अहवाल.

(चार) क्षेत्र अधिकारी, मतदान संपल्यानंतर, मतदानाच्या दिवसाच्या कामांविषयी, विहित केलेल्या नमुन्यात अहवाल सादर करील. हा अहवाल **जोडपत्र–दोन** मध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करण्यात येईल.

## जोडपत्र—एक

| अनुक्रमांक | पायाभूत सुविधा (होय/नाही/अहवाल) | | | | | | | | | | फेरीदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तुमच्यासोबत होते किंवा कसे (होय/नाही) | असुरक्षिततेचे मापन | मतदान केंद्र, गाव आणि जलग्रहण क्षेत्र यांमधील कोणतेही विशेष (निरीक्षण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भेट दिलेल्या मतदान केंद्राचे नाव व क्रमांक | चढणी-उतरणीचे रस्ते (रॅम्प) | प्रवेश मार्ग | पाणी | सावलीची जागा | स्वतंत्र प्रसाधनगृह | वीजेची जोडणी आणि प्लग पॉईंट | फर्निचर | तळमजल्यावरील मतदान केंद्र | मतदारांची संख्या | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | | |
| १५ | | | | | | | | | | | | | |
| चालू | | | | | | | | | | | | | |

शेरा :

क्षेत्र अधिकाऱ्याची स्वाक्षरी :

भेटीचा दिनांक :

## क्षेत्र अधिकारी अहवाल नमुना (मतदानाच्या दिवशी)

**क्षेत्र अधिकारी अहवाल नमुना (मतदानाच्या दिवशी)**

क्षेत्र अधिकाऱ्याचे नाव :

विधानसभा मतदार संघाचे (एसी) चे नाव व क्रमांक :

मार्ग क्रमांक :

उमेदवारांची संख्या :

**क्षेत्र अधिकाऱ्याची सही : भेटीची तारीख**

| | | |
|---|---|---|
| | १ | मतदान केंद्राचे नाव व क्रमांक |
| | २ | तैनात केलेली केंद्रीय सशस्त्र पोलीस दल होय/नाही |
| | ३ | नियुक्त केलेला सूक्ष्म निरीक्षक होय/नाही |
| | ४ | आंतरजालावरून प्रक्षेपण (वेबकास्टींग) केले जात आहे–होय/नाही |
| | ५ | व्हीडीओ कॅमेरा लावला आहे–होय/नाही |
| | ६ | एकूण मतदार |
| | ७ | अभिरूप मतदान झाले किंवा कसे (होय/नाही) |
| | ८ | उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींची संख्या |
| | ९ | मतदान प्रतिनिधीने पक्षाच्या उमेदवाराचे प्रतिनिधित्व केले नाही |
| | १० | पहिल्या भेटीत झालेले एकूण मतदान (वेळ नमूद करा) |
| | ११ | दुसऱ्या भेटीत झालेले एकूण मतदान (वेळ नमूद करा) |
| | १२ | तिसऱ्या भेटीत झालेले एकूण मतदान (वेळ नमूद करा) |
| | १३ | असुरक्षित मतदारांची ओळख पटविण्यात आली आहे किंवा कसे आणि तसे असेल तर त्यांनी केव्हा मतदान केले आहे |
| | १४ | मतदान समाप्त होण्याच्या वेळेनंतरही मतदान सुरू राहिले किंवा कसे (होय/नाही) |
| | १५ | टोकन घेऊन संध्याकाळी ५ वाजल्यानंतर मतदान केलेल्या मतदारांची संख्या |
| | १६ | मतदान संपल्यानंतर मतदान केलेल्या एकूण मतांची संख्या |
| | १७ | झालेल्या मतदानाची एकूण टक्केवारी |
| | १८ | यंत्रे बंद केली आहेत आणि ते योग्यपणे मोहरबंद केले आहे किंवा कसे (होय/नाही) |
| | १९ | मतदान केंद्राध्यक्षाकडून मतदान प्रतिनिधींना १७ सी ची प्रत दिली आहे किंवा कसे (होय/नाही) |
| | २० | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी १७ ए, १७ सी तपासली आहे आणि ती जुळली आहे किंवा कसे (होय/नाही) |
| | २१ | मतदानाच्या दिवशी प्राप्त झालेल्या तक्रारी |
| | २२ | प्रत्येक तक्रारीचा स्त्रोत, तिचे स्वरूप आणि तक्रारीच्या पाठपुराव्यासाठी केलेली कारवाई |
| | २३ | पुनर्मतदानाची शिफारस केली किंवा कसे (होय/नाही) |
| | २४ | (मशीन) यंत्र आणि वैधानिक कागदपत्रे सुरक्षित कक्षात जमा केली आहेत किंवा कसे (होय/नाही) |



भारत निर्वाचन आयोग

**Election Commission of India**

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.